## प्रेसनोट दिनांक २२/०४/२०२५

## रेकॉर्डवरील गुन्हेगाराकडून, घरफोडी चोरीचा गुन्हा उघडकीस.
## शहर गुन्हे शाखेची कामगिरी.

---

दिनांक १७/०४/२०२५ रोजी, गुन्हे शाखेकडील, स.पो.नि. संदिप पाटील व त्यांचे तपास पथकानी पोलीस रेकॉर्डवरील मोबाईल चोरीतील इसम नामे- **बसवराज मलप्पा पुजारी, वय-३० वर्षे, व्यवसाय-मजुरी, रा. मु.पो. तडवळगा, ता. इंडी, जि. विजापूर, राज्य-कर्नाटक** यास, सी.एन.एस. हॉस्पिटल जवळुन ताब्यात घेतले. त्यावेळी, त्यास कर्नाटक राज्यातुन सोलापूर येथे येण्याबाबत विचारपूस केली असता, तो उडवा-उडवीचे उत्तरे देवु लागला. त्यामुळे, त्याचेकडे अधिक चौकशी करणे आवश्यक असल्याने, त्यास गुन्हे शाखा कार्यालयात आणुन, त्याचेकडे, स.पो.नि. संदिप पाटील व त्यांचे तपास पथकाने, कौशल्यपुर्वक तपास केला असता, इसम नामे-बसवराज मलप्पा पुजारी याने, माहे मे-२०२२ मध्ये, सलगर वस्ती पोलीस ठाणे, सोलापूर शहर गु.र.नं.७६/२०२२ भा.दं.वि.क.४५४, ४५७, ३८० अन्वये दाखल गुन्हा केल्याची कबुली दिल्याने, त्यास गुन्ह्यात अटक करून, गुन्ह्यातील गेलामाल हस्तगत करणेकामी त्याची पोलीस कोठडी रिमांड घेतली असता, त्यांने खालील प्रमाणे गुन्ह्यातील सोन्या-चांदीचे दागिने काढुन दिले आहेत.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नं व कलम | जप्त मालाचे वर्णन |
|---|---|---|---|
| १ | सलगर वस्ती | गु.र.नं.७६/२०२२<br>भा.दं.वि.क.४५४, ४५७, ३८० | ६०.५ ग्रॅम सोने |

**वरील प्रमाणे, रात्रौ घरफोडी चोरीचा गुन्हा उघडकीस येवून, ६०.५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने (किंमत रू.१,५१,२५०/-) हस्तगत करण्यात आले आहेत.**

सदरची कामगीरी, मा. श्री. एम. राज कुमार, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, डॉ.दीपाली काळे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, श्री.राजन माने, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री.सुनिल दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा, सोलापूर शहर, यांचे मार्गदर्शनाखाली, स.पो.नि. संदिप पाटील व त्यांचे तपास पथकातील पोलीस अंमलदार- विजयकुमार वाळके, विद्यासागर मोहिते, तात्यासाहेब पाटील, गणेश शिंदे, सायबर पोलीस ठाणे कडील- प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड, चालक- घोळकर, यांनी केली आहे.




